# सावधगिरी सल्ला

**अनधिकृत खासगी संस्थांकडून देण्यात येणाऱ्या बेकायदेशीर आणि बनावट लोन सेटलमेंट / सल्लागार सेवांपासून सावध रहा.**

प्रिय ग्राहक,

काही मान्यता नसलेल्या, अनधिकृत खासगी संस्थांकडून ('संस्था') (i) विशेष करून फेसबुक आणि ट्वीटरसारख्या समाज माध्यमातील जाहिरातींच्या माध्यमातून, (ii) सर्च इंजिनद्वारे (उदा. गुगल इ.) शोधता येतील अशा प्रकारे त्यांच्या संकेतस्थळावर प्रकाशित करून, (iii) संकेतस्थळावर, समाज माध्यमांमध्ये प्रसिद्ध आर्थिक संस्थांच्या ब्रँड लोगोचा आणि ट्रेडमार्कचा गैरवापर करून/अनधिकृत प्रसिद्धीद्वारे, (iv) संकेतस्थळावर खोटे प्रतिसाद प्रकाशित करून अजाण ग्राहकांना लक्ष्य केले जात असल्याचे आमच्या निदर्शनास आले आहे. आर्थिक संस्थांमार्फत लोन सेटलमेंटसाठी सल्ला/आगाऊ शुल्काच्या बदल्यात या संस्थांच्या अवैध कर्ज संबंधित समुपदेशन सेवांचा लाभ घेण्यासाठी निष्पाप ग्राहकांना भुरळ घातली जात आहे.

आपल्या बनावट लोन सेटलमेंट सेवा/ पर्यायांच्या माध्यमातून, थकबाकीदार ग्राहकांना लक्ष्य करणाऱ्या अनधिकृत, मान्यता नसलेल्या संस्थांच्या जाळ्यात न अडकण्याचा सावधगिरीचा सल्ला आम्ही आमच्या ग्राहकांना आणि सामान्य जनतेला देत आहोत. या प्रक्रियेत ग्राहकांचे ('पीडित') आर्थिक नुकसान होऊ शकते.

या संस्थांची काम करण्याची पद्धत पुढीलप्रमाणे आहे:

1. या संस्था स्वत: ग्राहक आणि बँकेच्या किंवा एनबीएफसी ('धनको') मधील दुवा असल्याचा आव आणतात आणि लोन सेटलमेंट करण्यासाठी पीडितांची मदत करत असल्याचा बहाणा करतात. या संस्था पुढीलप्रकारची खोटी आश्वासने देतात-
   I. त्यांच्या स्वत:च्या विशेष कायदेशीर अधिकारांचा वापर करून अतिशय कमी रक्कम भरून कर्जफेड;
   II. त्यांच्या विधीसहाय्याचा वापर करून ग्राहकांच्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेची सुरक्षा; आणि
   III. अत्यंत अल्प रक्कम भरून काळ्या यादीतील कंपन्यांच्या मोठ्या थकबाकीची परतफेड

2. पीडित व्यक्तीने त्यांच्यासोबत करार/कागदपत्रांचा व्यवहार करावा आणि पीडित व्यक्तीच्या वतीने काम करता यावे यासाठी तिच्याकडून मुखत्यार पत्र मिळावे, ही त्यांची गरज असते.

3. ते निष्पाप ग्राहकांची फसवणूक करतात:

(अ) किमान 2 महिन्यांसाठी ईएमआय रक्कम न भरण्यासाठी चिथावणी देऊन किंवा त्यांच्या खोट्या कर्जफेड उपायांचा एक भाग म्हणून ही रक्कम अशाच संस्थेच्या खास 'निपटारा' बँक खात्यात जमा करण्यासाठी फूस लावून;

(आ) आपल्याकडे असलेल्या कौशल्याने संस्था अविश्वसनीय अशा अत्यल्प किमतीमध्ये ग्राहकाची कर्जफेड करेल अशास्वरूपाचे आश्वासन देऊन;

(इ) या घटनेचा परिणाम ग्राहकांच्या CIBIL (सीबिल) नोंदीत होणार नाही, याची हमी देऊन ते ग्राहकांना ईएमआय रक्कम भरण्यात कसूर करायला लावतात किंवा कमी ईएमआय भरायला भाग पाडतात;

(ई) त्यांच्या धोरणाचा एक भाग म्हणून, धनकोने कायद्याचा/नियमांचा भंग केला असल्याचा आरोप करून, त्याच्यावर बिनबुडाचे आरोप करून ते एक नोटीस जारी करतात; आणि

(उ) पीडित व्यक्तीने तिचे इनकमिंग फोन कॉल्स डायव्हर्ट करावे, ही त्यांची गरज असते. धनकोने फोन केल्यास ते धनकोशी शिवराळ भाषेत बोलतात. धनकोकडून अशा वागणुकीची दखल घेतली जात नाही.

ग्राहक जर अशा संस्थांच्या जाळ्यात अडकला असला तरीही, ग्राहकाने भरणा करण्याच्या सूचना आधीच दिल्या असल्याने, त्याच्या खात्यात पुरेसा निधी नसल्यास रक्कम फेडली जाणार नाही, हे तुम्ही लक्षात घेतले पाहिजे, अशी विनंती आम्ही तुम्हाला करत आहोत. याचा परिणाम म्हणून-

(अ) बँक दंड/शुल्क आकारेल आणि ग्राहकाच्या बँक खात्यात जेव्हा पैसे असतील तेव्हा त्यातून ही रक्कम वळती केली जाईल. बँकेतर्फे दंड रकमेची वसुली ही त्याच महिन्यात किंवा अनेक महिने किंवा कोणत्याही ठरविक महिन्यात करण्यात येईल आणि

(आ) ईएमआयची रक्कम न भरल्यास धनको दंड ठोठावेल आणि ग्राहक तो भरण्यासाठी बाध्य असेल.

परिणामी, ग्राहकावर ईएमआय रकमेव्यतिरिक्त जास्तीच्या रकमेचा बोजा वाढेल. तसेच, रकमेची फेड न केल्याने ग्राहकाच्या क्रेडीट रेकॉर्डमधील सीबिल श्रेणीवर याचा नकारात्मक प्रभाव पडेल.

ग्राहकाने मान्य केलेल्या कर्जाच्या अटी आणि नियमानुसार तो त्याचे/तिचे कर्ज परस्पर कोणालाही देऊ शकत नसल्याने धनको हा कर्जफेड/सल्लागार संस्थेला ओळखत नाही.

अशा सेवा कोणत्याही कायद्याअंतर्गत येत नसल्याने आणि धनकोने त्यांना अशी कोणतीही कृती करण्यासाठी अधिकृतरीत्या मान्यता दिली नसल्याने ग्राहकाकडून येणे असलेल्या रकमेचा बोजा वाढत

असताना आणि ग्राहकाच्या क्रेडीट श्रेणीवरील विपरीत परिणाम होत असतानाही, या संस्था कोणत्याही प्रकारची सेवा पुरवत नाहीत. निष्पाप पीडितांच्या कष्टाच्या पैशांची अफरातफर करण्याव्यतिरिक्त, अशा संस्था कोणत्याही सेवा देत नाहीत.

खोट्या/दिशाभूल करणाऱ्या जाहिराती आपल्या संकेतस्थळावर आणि विविध इलेक्ट्रॉनिक/ समाज माध्यम मंचावर प्रकाशित करणाऱ्या अशा बेकायदेशीर आणि लबाड संस्थांपासून ग्राहकांनी सावध रहावे, असे आवाहन आम्ही आमच्या ग्राहकांना करत आहोत. कोणत्याही प्रकारे अनधिकृत/बेकायदेशीर मार्गाने करण्यात आलेल्या लोन सेटलमेंट मध्ये क्रेडीट रेकॉर्ड खराब होण्याचा धोका असतो आणि कोणाहीकडून आलेल्या अशा चुकीच्या हमीला/दाव्याला ग्राहकांनी बळी पडू नये, अशी आमची कळकळीची विनंती आहे.

**सावध रहा, सुरक्षित रहा.**

बजाज फायनान्स लिमिटेडतर्फे जनजागृती सल्ला

.